ePaper
# मनसेचे उमेदवार अमित ठाकरे यांनी आचारसंहितेचा भंग केला

॥ वर्ष - 8 । अंक -113 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥




# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- रोहित-सूर्या-हार्दिक-बुमराह रिटेन
- युवा टीम इंडियाचा १०७ धावांत खुर्दा
- कॅनडाची अमेरिकेकडून दखल


www.mahaenews.com | शुक्रवार, दि.1 नोव्हेंबर 2024 | पुणे- पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# ‘इस्रो’ कडून 15 वर्षांचा रोडमॅप

## भारतीय अंतराळ संशोधनाचा माहिती उपलब्ध




। नवी दिल्ली । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी

**येत्या ३ महिन्यांत ‘इस्रो’ची (भारतीय अंतराळ संशोधन संस्था) गगनयान मोहिमेची (ISRO MISSION) पहिली मानवरहित मोहीम लॉंच होणार आहे. ‘इस्रो’त त्याच्या पूर्वतयारीचीच लगबग सुरू आहे. दुसरीकडे, ‘इस्रो’ने पुढील १५ वर्षांत राबवायच्या मोहिमांच्या रोडमॅपवरही शेवटचा हात फिरवून झाला आहे. ‘इस्रो’ने त्यासाठी ४० वर्षांचे कॅलेंडरही तयार केले आहे. त्यातून भारतीय अंतराळ मोहिमांबाबतची माहिती उपलब्ध झाली आहे.**

मानवरहित मोहिमेनंतर ‘इस्रो’ गगनयानातून ‘व्योममित्र’ नावाचा मानवसदृश रोबो पाठवणार आहे. एआयच्या (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) मदतीने या ‘व्योममित्र’ रोबोचे वर्तन अगदी मानवाप्रमाणे असेल.

२०२५ च्या अखेरीस अथवा २०२६ व्या सुरुवातीस तीन दिवसांच्या पृथ्वी परिक्रमेसाठी २ भारतीय अंतराळवीर पाठवण्याची ‘इस्रो’ची योजना आहे.

२०२९ पर्यंत ३ मानवी मोहिमा अंतराळात राबवल्या जातील. मोहिमेला प्राप्त यशाच्या आधारावर अंतराळ फेण्या व वीरांची संख्याही वाढवली जाईल.

### सहा उपग्रह पाठवणार

पुढच्याच वर्षी म्हणजे २०२५ मध्ये ‘इस्रो’ ६ उपग्रहांचे प्रक्षेपण करणार आहे.

नौदलासाठी जीसॅट-७ आर, लष्करासाठी जीसॅट-७ बी, ब्रॉडबँड आणि इन-फ्लाईट कनेक्टिव्हिटीसाठी जीसॅट-एन २. सुरक्षा दले, निमलष्करी 3 दले. रेल्वेसाठी जीसॅट- एन ३, गगनयानासोबत कनेक्टिव्हिटीसाठी २ उपग्रहही लॉंच केले जातील.

गगनयान या ३ दिवसांच्या मोहिमेत अंतराळवीरांना पृथ्वीच्या ४०० कि. मी. वरील कक्षेत पाठवले जाईल आणि नंतर सुरक्षितरीत्या समुद्रात उतरवले जाईल. यात यशस्वी ठरल्यास अमेरिका, चीन आणि रशियानंतर भारत असा चौथा देश ठरेल.

### ‘इस्रो’चे कॅलेंडर...

2025 - मनुष्य चंद्राच्या कक्षेत फिरून पृथ्वीवर परत येणार.
2027 - चांद्रयान-४ मिशन लॉंच करणार, चंद्रावरून नमुने आणणार.
2028 - भारतीय अंतराळ स्थानकाचे मॉडेल-१ अंतराळात पाठवणार, स्वदेशी यान जोडणी प्रयोगही अंतराळात पार पडेल. अंतराळातच २ याने परस्परांना जोडली जातील.
2031 - चंद्रावर मानवी मोहीम.
2035 - अंतराळात भारताचे स्थानक उभारणार
2037 - भारतीय रोबो चंद्राच्या पृष्ठभागावर उतरणार. शुक्रावर यान पाठवणार.
2040 - चंद्रावर भारतीय पाऊल उमटवण्याची योजना.
नौदल, लष्कर, ब्रॉडबँड, इन- फ्लाईट कनेक्टिव्हिटी, सुरक्षा दले, निमलष्करी दले. रेल्वेसाठी उपग्रह होणार लॉंच

## ‘आरपीआय’ महायुतीच्या उमेदवारांचे काम करणार!

# पिंपरी विधानसभा रणसंग्राम : आमदार आण्णा बनसोडे यांचा दिलासा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महायुतीच्या उमेदवारांना निवडून आणायचे आहे असा आदेश आम्हाला वरिष्ठांकडून मिळालेला आहे. त्यानुसार आम्ही कामाला लागलो आहोत असे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) पक्षाचे पिंपरी चिंचवड येथील ज्येष्ठ नेते बाळासाहेब भागवत यांनी सांगितले.**




महायुतीकडून पिंपरी मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार अण्णा बनसोडे यांना संधी देण्यात आली आहे. अण्णा बनसोडे यांनी अर्ज दाखल केल्यानंतर घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये बाळासाहेब भागवत यांनी पक्षाची भूमिका स्पष्ट केली. यावेळी शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर उपस्थित होते.

यावेळी भागवत म्हणाले अण्णा बनसोडे हे आमच्यासाठी सर्वसमावेशक नेतृत्व आहे. त्यांच्या प्रचारासाठी आम्ही एकजुटीने काम करणार आहोत. त्यांना पिंपरी मतदारसंघांमधून लाखाचे लीड मिळवून देण्याचा आमचा विश्वास आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांच्याकडून आदेश प्राप्त झाला आहे त्यानुसार महायुतीच्या प्रत्येक उमेदवाराचे काम ठिकठिकाणी कार्यकर्ते करणार आहेत. पिंपरीत देखील कार्यकर्त्यांची एकजूट अण्णा बनसोडे यांच्या पाठीशी उभी राहणार आहे. दरम्यान या मतदारसंघातून माजी नगरसेविका चंद्रकांता सोनकांबळे, तसेच स्वप्निल सोनकांबळे यांनी बंडखोरी केली आहे. त्यांना माघार घेण्याबद्दल पक्षाने सांगितले आहे असे देखील भागवत यावेळी म्हणाले.

### बंडखोरीमुळे मविआची डोकेदुखी...

दरम्यान, पिंपरी विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडीमध्ये बंडखोरी झाली आहे. ठाकरे गटाचे माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार आणि शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भराला आहे. या मतदार संघामध्ये ठाकरे गटाला मानणारा मोठा मतदार वर्ग आहे. त्यामुळे ही जागा ठाकरे गटाला मिळावी, अशी अपेक्षा निष्ठावंत शिवसैनिकांकडून व्यक्त होत होती. मात्र, महाविकास आघाडीच्या जागा वाटपामध्ये डावलण्यात आले, अशी भावना शिवसैनिकांची आहे. तसेच, राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या उमेदवाराचे काम करणार नाही, अशी भूमिका शिवसैनिकांनी घेतली आहे. त्यामुळे उमेदवार सुलक्षणा शिलवंत यांची डोकेदुखी वाढणार आहे.

# जाबाब पोलीस अधिकाऱ्यांना दक्षता पदक!

## इसीस दहशतवाद्यांची साखळी 'ब्रेक' केल्याची दखल

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कोथरूड परिसरात दहशतवादी पकडणाऱ्या पुणे पोलीस दलातील तत्कालीन वरिष्ठ पोलिस निरीक्षकांना व पुढे तपास पुणे दहशतवादी विरोधी पथकाकडे गेल्यानंतर मोठी साखळी ब्रेक करणाऱ्या अधिकाऱ्यांना आज (दि.३१) केंद्रीय गृहमंत्र्यांचे दक्षता पदक जाहीर करण्यात आले.**



तत्कालिन कोथरूड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक हेमंत चंद्रकांत पाटील तसेच दहशतवाद विरोधी पथकाचे पोलिस अधीक्षक जयंत मीना, सहायक पोलिस निरीक्षक रवींद्र गवारी, सहायक पोलीस निरीक्षक स्वप्रील चव्हाण आणि सहायक पोलिस चंद्रकांत लोहकरे यांचा हे पदक देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

प्रमुख संशयितांमध्ये मोहम्मद शहानवाझ आलम, रिजवान अली, अब्दुलाह शेख आणि तलाह लियाकत खान, मोहम्मद इम्रान मोहम्मद युसुफ खान ऊर्फ मटका ऊर्फ अमीर अब्दुल हमिद खान (रा. रतलाम मध्यप्रदेश), मोहम्मद युनुस मोहम्मद याकुब साकी ऊर्फ अदिल ऊर्फ अदिल सलीम खान (रा. रतलाम, मध्यप्रदेश), कादीर दस्तगिर पठाण ऊर्फ अब्दुल कादीर (रा. कोंढवा, पुणे), समीब नासीरउद्दीन काझी (रा. कोंढवा पुणे), जुल्फीकार अली बडोदवाला ऊर्फ लालाभाई ऊर्फ लाला ऊर्फ सईफ, शमिल साकिब नाचन आणि आकिफ अतिक नाचन (रा. तिघेही रा. पडघा, ठाणे) यांचा समावेश आहे. या सर्व संशयितांवर आरोपपत्र दाखल करण्यात आले होते.

### दहशदवादी हल्ल्याचा कट...

पकडण्यात आलेले सर्व दहशतवादी इसिस या दहशतवादी संघटनेशी संबंधित असल्याचे निष्पन्न झाले होते. त्यांनी पुण्यात आणि महाराष्ट्रात मोठे दहशतवादी कृत्य करण्याचा कट आखल्याचेही एनआयएने केलेल्या तपासात निष्पन्न झाले आहे. पकडण्यात आलेले दहशतवादी विदेशात बसलेल्या हँडलरच्या सिक्रेट अॅपद्वारे संपर्कात असल्याचेही तपासात समोर आले आहे. त्यांनी दरोडे, चोऱ्या करून दहशतवादी कृत्यासाठी निधी उभा केल्याचे व त्यांनी हँडलर कडून देखील पैसे घेतल्याचे निष्पन्न झाले आहे. हे दहशतवाद्यांनी आयईडी (इम्प्रूव्हाईस एक्स्पोझीव्ह डिव्हाईस) म्हणजेच बॉम्ब बनविण्याचे प्रशिक्षण कोंढव्यात घेतले होते. त्या आधारे त्यांनी जंगलात रेकी करून नियंत्रित स्फोटाच्या चाचण्या देखील घडवून आणल्या होत्या. त्यांचा महाराष्ट्रातील तसेच गुजरात मधील मेट्रोसिटीमध्ये स्फोट घडवून आणण्याचा देखील मानस होता. त्यांनी दहशतवादी कारवाईसाठी शस्त्र चालविण्याचे प्रशिक्षण देखील घेतल्याचे एनआएच्या तपासात निष्पन्न झाले आहे. त्यांनी त्यांचा परदेशातील इसिसचा दहशतवादी हँडलर खलिफा याच्याकडून इसिसशी संबंधित शपथ घेतली असल्याचे निष्पन्न झाले होते.

# दिल्ली ते पुणे विमानात बॉम्बची अफवा

## पुणे विमानतळवर पुन्हा खळबळ : विमान वाहतुकीवर प्रतिकूल परिणाम

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या काही दिवसांपासून पुणे विमानतळावरून उड्डाण करणाऱ्या तसेच पुणे विमानतळावर येणाऱ्या देश-परदेशातील विमानांमध्ये बॉम्ब असल्याचा संदेश समाज माध्यमांद्वारे येत असल्याचा प्रतिकूल परिणाम विमान वाहतुकीवर होत आहे. अशाच प्रकारे विस्तारा विमान कंपनीची दिल्ली ते पुणे फ्लाईट क्रमांक युके ९९१ मध्ये बॉम्ब असल्याचा संदेश अॅडम अलंजा ६४६ ट्विटर हँडल वरून अज्ञात व्यक्तीने दिला. त्यामुळे पुणे विमानतळावर पुन्हा खळबळ उडाली. याप्रकरणी तपासानंतर ही अफवा असल्याचे निष्पन्न झाले.**




याबाबत विमानतळ पोलीस ठाण्यात विजय गणपत नाणेकर (वय ३५, रा. टिंगरेनगर) यांनी अज्ञात ट्विटर हँडल विरोधात तक्रार दाखल केली आहे. अज्ञात व्यक्तीने अॅडम अलंजा ६४६ ट्विटर हँडल वरून 'आय प्लेस्ड पाईप बॉम्बस ऑन बोर्ड ऑफ द फॉलोइंग फ्लाइट्स युके' असा संदेश प्रसारित केला. धमकी असलेला मजकूर ट्विट करून विस्तारा कंपनीचे विमान दिल्ली ते पुणे या विमानामधील प्रवासी तसेच विमानतळ परिसरातील नागरिक आणि प्रवाशांमध्ये खोटी माहिती पसरवूनन भीतीदायक वातावरण निर्माण केले.

तसेच त्यांच्या जीवितास तसेच सुरक्षेस धोका निर्माण केला आहे. याबाबत विमानतळ पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक एन धामणे पुढील तपास करत आहेत.

दरम्यान, याबाबत श्रीकांत चंद्रशेखर वडगावकर (वय 37) यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, 'डम अलांझा 1000' या नावाने समाज माध्यमात खाते वापरणाऱ्या एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इंडिगो एअरलाइन्सच्या गुरुग्राम येथील अधिकृत समाज माध्यमातील खात्यावर डम अलांझा या नावाने संदेश पाठविण्यात आला.

विमानात बॉम्ब ठेवण्यात आल्याची धमकी संदेशाद्वारे देण्यात आली. संबंधित संदेश आल्यानंतर पाटणा ते पुणे, बेंगळुरू ते पुणे, कोलकाता ते पुणे या विमानांची तपासणी करण्यात आली. प्रवाशांना विमानातून उतरविण्यात आले. या संदेशामुळे विमानसेवेवर परिणाम झाला, असे फिर्यादीत म्हटले आहे. अशाच प्रकारचा संदेश पाठविल्याप्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दोन दिवसांपूर्वीही अशीच धमकी...

पुणे विमानतळावर दोन दिवसापूर्वी अशाच प्रकारे इंडिगो एअरलाइन्सच्या हैदराबाद ते पुणे, जोधपूर ते पुणे हा विमान प्रवास करणाऱ्या विमानांना 'या विमानांमध्ये बॉम्ब आहे', असा संदेश मंदआइमेसर या ट्विटर हँडल वरून आला होता. तसेच वेगवेगळ्या विमानांचे क्रमांकही देण्यात आले होते. अशाप्रकारे विमानातील प्रवासी तसेच विमानतळ परिसरातील नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करून अफवा पसरवण्यात आली होती.

# उपमुख्यमंत्री अजित पवारांची 'साखर पेरणी'!

## चिंचवडमध्ये महायुतीत बंडखोरी रोखणार : नाना काटे यांची घेतली भेट

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवडमध्ये अजित पवारांचे समर्थक नाना काटे यांनी बंडखोरी केली आहे. त्यांच्या बंडखोरीचा फटका महायुती किंवा महाविकास आघाडी या दोघांपैकी एकाला नक्कीच बसणार आहे. हे पाहता राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार स्वतः नाना काटे यांची मनधरणी करण्यासाठी त्यांच्या घरी पोहचले. थेट अजित पवारांकडून काटे यांना समजवण्याचा प्रयत्न सुरु आहेत.**



या बैठकीनंतर नाना काटे माघार घेणार की बंडखोरीवर ठाम राहणार, याकडे सर्वांचं लक्ष लागून आहे. महायुतीतील मित्रपक्षातील भाजपकडून शंकर जगताप आणि शरद पवार गटाकडून राहुल कलाटे मैदानात आहेत. त्यांच्याविरोधात काटे यांनी अपक्ष अर्ज दाखल केलाय. पण दादांच्या मनधरणी नंतर ते काय भूमीका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

### शरद पवारांच्या पक्षांकडून राहुल कलाटेंना उमेदवारी

चिंचवडमधून उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुक नेत्यांनी शरद पवारांची भेट घेतली होती. या भेटीत तिघांना एकमत करण्याच्या सूचना शरद पवारांनी दिल्या होत्या. मात्र, चिंचवडमधून राहुल कलाटे यांना राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारी देण्यात आली. त्यानंतर आता नाना काटेंच्या भूमिकेकडे सर्वांचं लक्ष्य लागलं होतं.

### मी सांगेन तो निर्णय घ्यावा लागेल : पवार

दरम्यान, "अधिकृत उमेदवार व्यतिरिक्त राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे, त्यांना मी सांगेल तो निर्णय घ्यावा लागेल " असं स्पष्ट शब्दात अजित पवारांनी बंडखोरांना ताकीद दिली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार हे पिंपरी- चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते. अजित पवारांनी काही मिनिटं बंडखोर नाना काटे यांची भेट घेऊन चर्चा केली आहे.

मावळमध्येही तिढा निर्माण झाला आहे.याबद्दल काल चर्चा झाली आहे. अशा ठिकाणी सामंजस्य भूमिका घ्यावी लागेल.उमेदवाराने ऐकलं नाही तर काही कठोर निर्णय घेणार असं अजित पवार यांनी सांगितलं. शिवतारे यांच्या बाबत प्रश्न विचारला असता "मी महायुतीचा जबाबदार व्यक्ती आहे. प्रत्येकाच्या बद्दल बोलणार नाही. २० तारखेपर्यंत एकोपा ठेवायचा आहे. यावर मी उत्तर देणार नाही" असं अजित पवार म्हणाले.

### अपक्ष उमेदवार भाऊसाहेब भोईर अदखलपात्र?

विशेष म्हणजे, राष्ट्रवादीचेच माजी स्वीकृत नगरसेवक भाऊसाहेब भोईर यांनीही बंडखोरी केली आहे. मात्र, त्यांची मनधरणी करण्यासाठी अजित पवार यांनी कसलीही हालचाल केली नाही. त्यामुळे भाऊसाहेब यांची उमेदवारी पक्षाच्या दृष्टीने अदखलपात्र आहे का? असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

### चिंचवडमध्ये चौरंगी लढत...

चिंचवडमध्ये चौरंगी लढत होणार आहे. चिंचवडमध्ये महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांनी अर्ज दाखल केला आहे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे बंडखोर उमेदवार नाना काटे, भाऊसाहेब भोईर यांनी देखील अपक्ष अर्ज भरला आहे. महाविकास आघाडीकडून राहुल कलाटे यांना उमेदवारी असल्याने चौरंगी लढत दिसत आहे. मात्र, अजित पवारांनी नाना काटेंची भेट घेऊन समजूत घातल्यामुळे नाना काटेंच्या भुमिकेकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

### ... तशी काही चर्चा नाही : काटे

दिवाळी निमित्त अजितदादांनी मला फोन केला भेटून जाईल असे सांगितले होते. त्यांनी मला दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. अपक्ष अर्ज मागे घेण्याबाबत काही चर्चा झाली नाही. चिंचवडमध्ये भाजपचा महायुतीचा उमेदवार आहे. त्याबाबत त्यांनी कार्यकर्त्यांशी चर्चा केली. आता तरी मी अर्ज मागे घेतला नाहीये. अपक्ष म्हणून लढण्याबर मी आणि भाऊसाहेब भोईर ठाम आहेत. अजितदादांची काही सूचना आल्यास तुम्ही माघार घेणार का? असे विचारले असता काटे म्हणाले, आता काही सांगता येणार नाही. त्यावेळीच निर्णय घेईल.

---

# रावेतमध्ये शंकर जगताप यांच्या प्रचारार्थ घोंगडी बैठक

## महायुतीच्या पदाधिकाऱ्यांकडून प्रचारात जोरदार आघाडी

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा मतदारसंघातील भाजप – शिवसेना – राष्ट्रवादी काँग्रेस – आरपीआय (आठवले) मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांच्या प्रचारार्थ रावेत प्रभागातील भाजप आणि महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने घोंगडी बैठका आणि कोपरा सभांचा धडाका लावत प्रचारात आघाडी घेतली आहे.**



भारतीय जनता पक्षाने जाहीर केलेल्या उमेदवारांच्या पहिल्या यादीत शंकर जगताप यांचे नाव जाहीर होताच महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी जोरदार प्रचार करत उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वीच रावेतमधील प्रचाराचा पहिला टप्पा पूर्ण केला आहे.

रावेतमधील नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत महायुतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या घोंगडी बैठका आणि कोपरा सभांना स्वयंस्फूर्तीने हजेरी लावली. आणि रावेत गावच्या सर्वांगीण विकासासाठी महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांनाच मतदान करण्याचा संकल्प केला.

वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी शंकर जगताप यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच रावेतमधील १८ मीटर डीपी रस्त्यांचा विषय मार्गी लागला. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते या कामांचा शुभारंभही करण्यात आला. त्याबद्दल रावेतमधील सर्व सोसायटीधारक आणि नागरिकांनी जगताप यांचे आभार व्यक्त करत यापुढेही रावेतच्या शाश्वत विकासासाठी त्यांनाच मतदान करू, असा निर्धारही त्यांनी केला.

### परिसरातील नागरिकांचा सहभाग

या घोंगडी बैठकांचे नियोजन माजी नगरसेविका संगीता भोंडवे, रावेत-काळेवाडी मंडलअध्यक्ष सोमनाथ भोंडवे, माजी स्वीकृत सदस्य संदीप गाडे, पोपट भोंडवे, युवा नेते दीपक भोंडवे, सुरेश भोंडवे, कुणाल भोंडवे, अजय भोंडवे, श्रीकांत भोंडवे, किरण भोंडवे, सुनील भोंडवे यांनी केले होते. तर यावेळी सिल्वर लँड फेज 3 सोसायटीचे चेअरमन वैभव देशमुख, नचिकेत देशमुख, अविनाश चोबले, विकास जाधव, सुशील कदम, प्रतिभा देशमुख आदी उपस्थित होते.



## भूमिका

# हरियाणा पॅटर्न महाराष्ट्रात यशस्वी होणार

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाराष्ट्राकडे देशाचे लक्ष लागले आहे. भाजपने हरियाणात जातींच्या विभक्तीकरणाचे 'मायक्रो मॅनेजमेंट' करत सलग तिसऱ्यांदा सत्तारूढ होण्याचा विक्रम केला. या 'हरियाणा पॅटर्नची' देशभर चर्चा झाली.**

आता हाच पॅटर्न भाजप महाराष्ट्रात राबविण्याच्या तयारीत असल्याचे संकेत मिळत आहेत. मात्र हा 'हरियाणा पॅटर्न' काय आहे? महाराष्ट्रात ती रणनीती कशी आखली जात आहे, हे समजून घ्यावे लागेल. हरियाणात जाटांची लोकसंख्या २७ टक्के असून; ३३ वर्ष जाट मुख्यमंत्री होता. राज्याचे राजकारण या जातीभोवती फिरत आले आहे. कॉंग्रेस, भाजप किंवा अन्य कोणताही पक्ष जाटांना आपल्या सोबत ठेवण्यसाठी सातत्याने प्रयत्न करत आले आहेत. लोकसभेत ६८ टक्के जाटांचे मतदान कॉंग्रेसला मिळाले होते. परिणामी २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत खातेही न उघडणाऱ्या कॉंग्रेस पक्षाचे २०२४ मध्ये पाच खासदार निवडून आले. विधानसभेच्या ४४ मतदार संघात पक्षाला आघाडी होती. विधानसभेत हाच ट्रेंड कायम राहील हे गृहीत धरून कॉंग्रेसने ३५ जाट उमेदवार दिले. दुसऱ्या बाजूला भाजप



जाटेतर ओबीसी जातींच्या मतांच्या ध्रुवीकरणाची रणनीती आखली होती. त्यासाठी भाजपने लोकसभा निवडणुकीच्या उंबरठ्यावर हरियाणाचे तत्कालीन मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांच्या जागी नायबसिंग सैनी यांना मुख्यमंत्री बनवून ओबीसी कार्ड खेळले. पुढे सैनी यांनी आपल्या ५६ दिवसांच्या कार्यकाळात तब्बल १२६ निर्णय घेतले. यामध्ये ओबीसीना लक्ष्य करत तीन महत्वपूर्ण निर्णय घेतले. १) नॉन – क्रिमिलेयरच्या उत्पन्नाची मर्यादा सहा वरून आठ लाख करणे. २) ओबीसी आरक्षणाची मर्यादा १५ टक्के वरून केंद्राच्या धोरणानुसार २७ टक्के करणे. ३) स्थानिक स्वराज्य संस्थेत ओबीसीतील अ – गटाला आठ टक्के तर ब – गटाला पाच टक्के आरक्षणाची तरतूद करणे. तसेच तिकीट वाटपात ही भाजपने सर्वाधिक २४ ओबीसी उमेदवार दिले. याशिवाय महत्वाचे म्हणजे अहिर, सैनी, यादव, कुशवाह, लोध, शाक्य मौर्य या जातींसह ३६ ओबीसी विरुद्ध १ जाट असे जातीय ध्रुवीकरणाला पोषक असा प्रचार केला.याचा थेट लाभ भाजपला झाल्याचे निकालातून दिसले. हरियाणातील भाजपच्या यशात जाटेतर दलितांची साथ महत्वाची होती असे मानले जाते. लोकसभा निवडणुकीत ६८ टक्के दलितांचे मतदान कॉंग्रेसला मिळाले होते. त्यातून धडा घेत जाटव – जाटेतर मतांच्या विभक्तीकरणाची रणनीती भाजपने आखली. त्यासाठी आरक्षण लाभवंचित असलेल्या जाटेतर ३६ जातींना आपले लक्ष्य करण्यात आले. या जातींची लोकसंख्या ५२.४० टक्के आहे. जाटव – जाटवेतर यांच्यात आरक्षणाच्या लाभावरून संघर्ष होताच. जाटव हा कॉंग्रेस आणि बसपचा पारंपरिक मतदार आहे. त्यामुळे जाटवतर मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी सैनी सरकारने आचारसंहिता लागू झाल्यानंतरही अनु.जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याचा निर्णय घेतला. अनु.जाती प्रवर्गासाठी राखीव असलेल्या २० टक्के आरक्षणाचे डीप्राइव्हड शेड्यूल्ड कास्ट (डीएससी) – १० %, अन्य शेड्यूल्ड कास्ट (ओएससी)– १०% असे उपवर्गीकरण केले. याशिवाय तिकीट वाटपात ही कॉंग्रेसने जाटवांना तर भाजपने जाटवेतर दलितांना झुकते माप दिले. या फॅक्टरची भाजपच्या यशात महत्वाची भूमिका असल्याचे दिसते. राखीव मतदारसंघातील १७ पैकी नऊ जागा भाजपचे जिंकल्या. तसेच सीएसडीएस – लोकनितीने केलेल्या अभ्यासानुसार जाटवांचे ५० टक्के मतदान कॉंग्रेसला तर वंचित अनु.जाती गटातील ४५ टक्के मतदान भाजपच्या बाजूने झाले आहे. हरियाणापेक्षा जास्त दारुण पराभव लोकसभा निवडणुकीत भाजपचा महाराष्ट्रात झाला होता. या पराभवास तीन महत्वपूर्ण कारणे जबाबदार होती. १) जरांगे फॅक्टर, २) दलित व मुस्लिमांची एक गट्टा मत महाविकास आघाडीला मिळणे. शिल्पकारांना धडा शिकविणे. भाजपला महाराष्ट्रात जिंकायचे असेल तर या तिन्ही कारणावर उपाय शोधावे लागतील. त्यासाठी भाजप हरियाणाच्या धर्तीवर आपली रणनीती आखत असल्याचे लक्षण दिसत आहेत.

## संपादकीय »

# ओम शांति ओम!

***भ्रष्ट' किंवा 'विश्वासघात', 'लैंगिक छळ' हे शब्द असंसदीय ठरवण्यातून सत्ताधाऱ्यांवरील संस्कार दिसून येतात..***

येत्या सोमवारपासून सुरू होणाऱ्या संसद अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांच्या लोकसभा सचिवालयाने अनेक शब्द असंसदीय ठरवले आहेत. यात आश्चर्य नाही याची प्रमुख कारणे दोन. पहिले म्हणजे हे सद्गृहस्थ वाक्पटुत्व, विद्वत्ता आदींसाठी ओळखले जातात असे नाही. ज्यांनी आपणास या पदावर नेमले त्यांच्या ऋणात राहणे, त्यांस कमीतकमी त्रास होईल यासाठी कार्यतत्पर असणे असाच त्यांचा लौकिक आणि तसेच त्यांचे वर्तन. बहुधा त्यामुळेच त्यांच्या चेहऱ्यावर सतत तृप्ततेची एक अदृश्य साय कायम असते आणि ही तृप्तता त्यांच्या सदैव सस्मित चेहऱ्यावर नांदतानाही दिसते. आणि दुसरे कारण म्हणजे ते ज्या विचारसरणीचे प्रतिनिधित्व करतात उलट तसे करणे म्हणजे पापच असे त्या विचारधारेत मानतात. 'बाबा वाक्यं प्रमाणम' हेच जीवनविषयक तत्त्वज्ञान असेल तर कशास हवे.

देशाचे पंतप्रधान म्हणून मोदींचे हे आठवे वर्ष. केंद्रात सत्तेत येण्यापूर्वी मोदी आणि भाजपने केलेल्या आश्वासनांची किती पूर्तता झाली, याचे उत्तर मिळणे कठीण आहे. कारण मोदी सरकारने दिलेली आश्वासने ही केवळ निवडणुका जिंकण्यासाठी दिलेली होती हे सिद्ध झाले आहे.

# भाजपलाच अच्छे दिन; जनतेसाठी दूरच

नको तिथे घ्यायला नकोत असेच निर्णय मोदींनी घेतले. मग ती नोटाबंदी असो, की शेतकरी कायदे असोत. २०१४ पूर्वी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता तर दूरच, स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी अनाकलनीय आणि अनपेक्षित निर्णयांनी मोदींनी देशाला अनेक वर्ष मागे नेले आहे. मोदींच्या कार्यकालाची आठ वर्षे ही मनमानी, राजकीय स्वार्थ आणि डबघाईला आलेली देशाची अर्थव्यवस्था अशीच करावी लागेल. एकीकडे देशाची वाटचाल अधोगतीकडे होत असताना मोदींच्या नेतृत्वात भाजपची झालेली भरभराट मोदींच्या आठ वर्षांच्या कार्यकालाची प्रचीती देणारे आहे. मोदी देशाचे पंतप्रधान म्हणून नाही तर भाजपचे नेते म्हणूनच अधिक प्रभावशाली ठरले. इथे एक लक्षात घ्यावे लागेल भाजप म्हणजे देश नव्हे, लोकशाहीतील केंद्र सरकारने अपेक्षित अशी कुठलीही कामगिरी केलेली नाही. केवळ भाजपच्या हिताला प्राधान्य देत मोदींचा कारभार सुरू आहे. यातून भाजपची पक्ष म्हणून



भरभराट होईलही, परंतु देशाला याची मोठी किंमत मोजावी लागते आहे याचे भान प्रत्येकाला असायला हवे.युपीए काळातील योजनांना नवीन नावे देत मोदी सरकारने स्वतःचे मार्केटिंग सुरू ठेवले. मुख्यमंत्री असताना मोदींनी जीएसटी, आधारसारख्या योजनांना कडाडून विरोध केला होता. जीएसटी परिषदेच्या बैठकांना असलेली मुख्यमंत्री मोदींची अनुपस्थिती आजही अनेकांच्या स्मरणात आहे. आज जीएसटी, आधार या योजना जणू मोदी सरकारचेच अपत्य असल्याच्या आविर्भावात त्यांचा मनमानी कारभार सुरू आहे. संसदेच्या पटलावर दिलेल्या आश्वासनांच्या पूर्तेत मोदी सरकार मागासलेले म्हणावे लागेल. १५ व्या आणि १६ व्या लोकसभेच्या दरम्यान त्यात ३०० टक्के वाढ झालेली दिसून येते. काही अहवालांनुसार जवळजवळ ७६ टक्के आश्वासनांची पूर्तता २०१८-१९ पर्यंत अपूर्ण होती. उपलब्ध आकडेवारीनुसार मोदी सरकारच्या पहिल्या कार्यकाळात दिली गेलेली १५४० आश्वासने संसदेच्या पटलावर आश्वासन देऊनही पूर्ण झाली नाहीत, तुलनेने यूपीएच्या कार्यकाळात ती आकडेवारी ३८५ इतकी होती. ती परंपरा अद्यापही कायम आहे. कुठल्याही विषयावर पंतप्रधान म्हणून मोदींनी घेतलेल्या निर्णयांची व त्यानंतर त्याच्या चांगल्या परिणामांची माहिती अथवा दुष्परिणामांची जबाबदारी मोदी घेऊ शकलेले नाहीत. आपल्या आठ वर्षांच्या कार्यकाळात एकही पत्रकार परिषद न घेणारे मोदी हे जगातल्या लोकशाही राष्ट्राचे एकमेव पंतप्रधान असावेत. आठ वर्षे केंद्रातील सरकार हे केवळ मार्केटिंग आणि जाहिरातीबाजीवर सुरू आहे. वेगवेगळ्या राज्यांतील निवडणुकीत विविध प्रकारे केलेली वेशभूषा.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# जरांगे दिल्ली हादरवणार?

## बौद्ध धर्मगुरूंची साथ? रणनिती तयार, हिंदीचा अडथळाही दूर

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मुस्लीम धर्मोपदेशक व बौद्ध धर्मगुरूंनी, रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष तथा आंबेडकरी समुदायाचे नेते आनंदराज आंबेडकर यांनी आज (३१ ऑक्टोबर) जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी या गावी जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. या भेटीनंतर मनोज जरांगे यांनी सांगितलं की मराठा, दलित व मुस्लिमांना एकत्र करण्याचं काम ते करणार आहेत.**



गोरगरिबांसाठीचा लढा आता आपण अधिक तीव्र करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. दरम्यान, या बैठकीनंतर मनोज जरांगे पाटील, मुस्लीम धर्मोपदेशक मौलाना सज्जाद नौमानी व आनंदराज आंबेडकर यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. यावेळी मौलाना नौमानी यांनी मनोज जरांगे यांना भारतभर फिरण्याचं आवाहन केलं. मनोज जरांगे यांना हिंदी भाषेत बोलता येत नसल्यामुळे ते महाराष्ट्राबाहेर जाण्याचं टाळतात, हे कळल्यावर नौमानी त्यांना म्हणाले, “अनुवादक म्हणून मी तुमच्याबरोबर देशभर फिरेन”. नौमानी म्हणाले, “भारताच्या संविधानासारखं संविधान जगाच्या पाठीवर कुठल्याही देशात अस्तित्वात नाही. शेतकरी, कष्टकरी, गरीब, वंचित आणि महिलांच्या हक्कांच्या बाबतीत आपलं संविधान सर्वोत्कृष्ट आहे. या संविधानाची निर्मिती करताना आणि देशाची घडी बसवताना महाराष्ट्राने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. महाराष्ट्रातील जनतेने ही गोष्ट गांभीर्याने पाहिली पाहिजे. आपल्या आजवरच्या आदर्श व्यक्तींच्या पावलांवर पाऊल टाकत महाराष्ट्राला व देशाला पुढे नेलं पाहिजे. देशातील अनेक मोठमोठे नेते, ज्यांनी देश घडवला, थोर स्वातंत्र्यसैनिक, क्रांतिकारक या महाराष्ट्रातूनच आपल्याला मिळाले. त्यातील काहींशी तुम्ही सहमत असाल अथवा नसाल, तरी देखील या राज्याने देशाला पुढे नेतील असे लोक जन्माला घातले आहेत. ही या भूमीची क्षमता आहे. मनोज जरांगे पाटील हे देखील त्यापैकी एक ताजं उदाहरण आहे”.मौलाना सज्जाद नौमानी म्हणाले, “मी उत्तर प्रदेशवरून येथे आलो आहे. मला मराठी बोलता येत नाही त्यामुळे मी तुम्हा सर्वांची माफी मागतो. मला मराठी नीट बोलता येत नाही आणि मनोज जरांगे यांना हिंदी येत नाही. त्यामुळे मी त्यांना हिंदी शिकवणार आहे. जेणेकरून मनोज जरांगे देशभरातील लोकांना संबोधित करू शकतील.

### हरियाणामधून बोलावणं आलं

भारताच्या संविधानासारखं संविधान जगाच्या पाठीवर कुठल्याही देशात अस्तित्वात नाही. शेतकरी, कष्टकरी, गरीब, वंचित आणि महिलांच्या हक्कांच्या बाबतीत आपलं संविधान सर्वोत्कृष्ट आहे. या संविधानाची निर्मिती करताना आणि देशाची घडी बसवताना महाराष्ट्राने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. महाराष्ट्रातील जनतेने ही गोष्ट गांभीर्याने पाहिली पाहिजे. आपल्या आजवरच्या आदर्श व्यक्तींच्या पावलांवर पाऊल टाकत महाराष्ट्राला व देशाला पुढे नेलं पाहिजे. देशातील अनेक मोठमोठे नेते, ज्यांनी देश घडवला, थोर स्वातंत्र्यसैनिक, क्रांतिकारक या महाराष्ट्रातूनच आपल्याला मिळाले. देशाच्या कानाकोपऱ्यात जाऊ शकतील.

देशाच्या कानाकोपऱ्यात जाऊ शकतील. मला मनोज जरांगे यांनी सांगितले की त्यांना हरियाणामधून बोलावणं आलं होतं. परंतु, त्यांना हिंदी येत नाही म्हणून ते तिकडे गेले नाहीत. पण मी त्यांना सांगितलं आहे. तुम्हाला हिंदी येत नाही म्हणून कुठे जाणं टाळू नका. तुम्हाला मान्य असेल तर मी तुमच्याबरोबर देशभर फिरेन. तुमचा अनुवादक म्हणून सर्वत्र यायला तयार आहे. तुमच्यासाठी मी मराठीतून हिंदीत अनुवाद करेन. तुम्ही देशभर फिरा. गोरगरिबांसाठीचा लढा आता आपण अधिक तीव्र करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. दरम्यान, या बैठकीनंतर मनोज जरांगे पाटील, मुस्लीम धर्मोपदेशक मौलाना सज्जाद नौमानी व आनंदराज आंबेडकर यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. यावेळी मौलाना नौमानी यांनी मनोज जरांगे यांना भारतभर फिरण्याचं आवाहन केलं. मनोज जरांगे यांना हिंदी भाषेत बोलता येत नसल्यामुळे ते महाराष्ट्राबाहेर जाण्याचं टाळतात, हे कळल्यावर नौमानी त्यांना म्हणाले, “अनुवादक म्हणून मी तुमच्याबरोबर देशभर फिरेन”. नौमानी म्हणाले.

---

# अमित ठाकरे यांनी आचारसंहितेचा भंग केला

## दीपोत्सवावरून आयोगाला पत्र; अमित ठाकरे अडचणीत येणार?

। अमरावती ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे दरवर्षी दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे दीपोत्सव साजरा केला जातो. या पार्कवर रोषणाई करून सेल्फी पॉइंट्स उभारले जातात. येथे फोट शूट करण्याकरता आणि स्नेहभेट घेण्याकरता अवघी मुंबापुरी उपस्थित राहते. परंतु, आता आचारसंहिता काळातही हा दीपोत्सव साजरा होत असल्याने शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाने यावर आक्षेप घेतला आहे.**




त्यांनी राज्याच्या मुख्य निवडणूक आयुक्तांना यासंदर्भात पत्र पाठवून कारवाई करण्याच आवाहन केले आहे.शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे उपसचिव सचिन परसनाईक यांनी राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त पत्र लिहिलंय.

त्या पत्रात म्हटलंय की, “महाराष्ट्र राज्यात विधानसभा निवडणूक २०२४ ची घोषणा झाली आहे. त्या अनुषंगाने संपूर्ण राज्यात आदर्श आचारसंहिता लागू असतानाही बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला छत्रपती शिवाजी महाराज पार्क या महानगरपालिकेच्या अखत्यारीतील सार्वजनिक स्थळावर निवडणूक आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन करून ‘दीपोत्सव’ साजरा करण्याची परवानगी देण्यात आली आहे. आदर्श आचारसंहिता काळात सार्वजनिक मालमत्ता विरूप करण्याच्या कलमाखाली हा सरळसरळ नियमभंग आहे.”

### सख्त कारवाईचे निर्देश द्यावेत

“तसेच या कार्यक्रमाच्या उद्घटनावेळी स्थानिक माहिम विधानसभा महाराष्ट्र नवनिर्माण सेना उमेदवार अमित राज ठाकरे यांनी उपस्थिती दर्शविली होती. त्यामुळे नियमानुसार उमेदवाराच्या निवडणूक खर्चात अंतर्भूत करणारी बाब ठरत असल्याने संपूर्ण दीपोत्सवाचा खर्च हा महाराष्ट्र नवनिर्माण सेना माहिम विधानसभा उमेदवार अमित राज ठाकरे यांच्या निवडणूक खर्चात समाविष्ट करण्यात यावाइतर संबंधित प्राधिकरणाचे अधिकारी यावर भारत निवडणूक आयोगाने सख्त कारवाईचे निर्देश द्यावेत”, अशी मागणीही पत्राद्वारे त्यांनी केली.

# कॅनडाच्या आरोपाची अमेरिकेकडून दखल

## कॅनडातील कथित कारवायांची संवेदनशील माहिती

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी कॅनडातील कथित हिंसक कारवायांचे संचालन केल्याचा आरोप कॅनडातील मंत्र्यांनी केला आहे. तसेच कॅनडाचे राष्ट्रीय सुरक्षा आणि गुप्तवार्ता सल्लागार नेथाली ड्रौइन यांनी भारताच्या कॅनडातील कथित कारवायांची संवेदनशील माहिती अमेरिकेतील ‘वॉशिंग्टन पोस्ट’ला दिल्याची कबुली दिली आहे.**



यानंतर आता अमेरिकेकडूनही या प्रकरणावर प्रतिक्रिया देण्यात आली असून कॅनडाने अमित शाहांवर केलेले आरोप गंभीर असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच कॅनडाशी या प्रकरणी चर्चा करणार असल्याचेही अमेरिकेने म्हटले आहे.अमेरिकेच्या स्टेट डिपार्टमेंटचे प्रवक्ते मॅथ्यू मिलर यांनी बुधवारी पत्रकार परिषदेला संबोधित करताना म्हटले की, कॅनडाने केलेल आरोप गंभीर आहेत आणि आम्ही कॅनडा सरकारशी या आरोपांबाबत चर्चा करू.भारत आणि कॅनडाचे संबंध दिवसेंदिवस खराब होत चालले आहेत. कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रुडो सातत्याने भारतविरोधी शक्तींना देशात आश्रय देत असल्याचं पाहायला मिळत आहे. तर, कॅनडातील काही हिंसक घटनांप्रकरणी तिथल्या जस्टिन ट्रुडो सरकारने भारतावर गंभीर आरोप केले आहेत. परंतु, भारताने ते आरोप फेटाळले आहेत. त्यापाठोपाठ भारताने आपले कॅनडातील उच्चायुक्त आणि अन्य राजनैतिक अधिकाऱ्यांना परत बोलावून घेतलं आहे. त्यानंतर कॅनडाचे भारतातील अधिकारी देखील मायदेशी परतले आहेत. खलिस्तानी फुटीरतावादी हरदीपसिंग निज्जरच्या हत्येत भारताच्या कथित सहभागाबाबतच्या आरोपानंतर भारत व कॅनडाचे संबंध बिघडले आहेत. दरम्यान, आता ट्रुडो सरकारने भारताचे गृहमंत्री अमित शाह यांच्यावर आरोप केले आहेत. अमित शाह यांचा कॅनडातील हिंसक घटनांमध्ये सहभाग असल्याचा आरोप कॅनडाने केला आहे. हे आरोप करत असताना त्यांनी कुठलाही पुरावा मात्र दिलेला नाही. रॉयटर्सने दिलेल्या वृत्तानुसार, मंगळवारी कॅनडा सरकारने आरोप केले की कॅनडामधील शीख फुटीरतावाद्यांना लक्ष्य करण्याच्या प्रकरणात अमित शाह यांचाही सहभाग आहे. शीख फुटीरतावाद्यांविरोधातील हिंसक घटनांमागे शाह यांचा हात असल्याचं कॅनडाने म्हटलं आहे. सर्वप्रथम वॉशिंग्टन पोस्टने एक वृत्त प्रसिद्ध केलं होतं की कॅनडा सरकारचे आरोप आहेत की शीख फुटीरतावाद्यांविरोधात कॅनडात झालेल्या हिंसाचाराच्या प्रकरणांमध्ये अमित शाह यांचाही सहभाग आहे.रॉयटर्सच्या वृत्तानुसार कॅनडाचे उप परराष्ट्रमंत्री डेव्हिड मॉरिसन यांनी संसदीय समितीला सांगितलं की शीख फुटीरतावाद्यांविरोधातील हिंसेमागे अमित शाह आहेत. मॉरिसन संसदीय समितीसमोर म्हणाले, “एका पत्रकाराने मला विचारलं की त्या हिंसाचारामागे असणारी व्यक्ती म्हणजे अमित शाह आहेत का? त्यावर मी पुष्टी केली की हो तीच व्यक्ती त्या सर्व घटनांमागे आहे”. विशेष म्हणजे यावेळी देखील कॅनडाने भारतावर नुसते आरोप केले आहेत, मात्र कुठल्याही प्रकारचा पुरावा दिलेला नाही.कॅनडाचे उपराष्ट्रपती डेव्हिड मॉरिसन आणि गुप्तवार्ता सल्लागार नेथाली ड्रौइन यांनी अमित शाह यांच्यावर कथित हिंसक कारवायांचा आरोप केला होता. कॅनडामधील ‘द ग्लोब अँड मेल’ने याबाबतीत वृत्त प्रसिद्ध केले आहे. या वृत्तानुसार, ड्रौइन यांनी संसदेच्या सार्वजनिक सुरक्षा समितीला माहिती देताना ही कबुली दिली. विशेष म्हणजे ही माहिती कॅनडातील जनतेला प्रथम न सांगता अमेरिकेतील वृत्तपत्राला दिल्याचे समर्थनही त्यांनी (पान ८ वर) (पान १ वरून) केले आहे. अशी संवेदनशील माहिती ‘वॉशिंग्टन पोस्ट’ला द्यायला ट्रुडो यांच्या परवानगीची गरज नसल्याचे ड्रौइन यांनी सांगितले. तसेच, कुठलीही गोपनीय माहिती दिली नसल्याचा खुलासा त्यांनी यावेळी सांगितले.रॉयल कॅनडियन माउंटेड पोलीस आयुक्त दुहेमे यांनी सांगितले, की पुराव्यांनुसार, तीन हत्या प्रकरणांत भारताचा सहभाग आहे. पण, केवळ निज्जर हत्या प्रकरणातच आरोपनिश्चिती केली आहे.

### कारवायांची संवेदनशील माहिती

निज्जर हत्या प्रकरणात चार भारतीयांवर आरोप आहेत. इकॉनॉमिक टाइम्सने दिलेल्या माहितीनुसार, भारत सरकारने कॅनडाचा आरोप फेटाळून लावला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी खलिस्तानी कट्टरपंथीयांना लक्ष्य केल्याचा दावा अतिशय खोटा आणि बिनबुडाचा असल्याचे भारत सरकारने म्हटले आहे.केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी कॅनडातील कथित हिंसक कारवायांचे संचालन केल्याचा आरोप कॅनडातील मंत्र्यांनी केला आहे. तसेच कॅनडाचे राष्ट्रीय सुरक्षा आणि गुप्तवार्ता सल्लागार नेथाली ड्रौइन यांनी भारताच्या कॅनडातील कथित कारवायांची संवेदनशील माहिती अमेरिकेतील ‘वॉशिंग्टन पोस्ट’ला दिल्याची कबुली दिली आहे.

# २४५ अपक्ष आमदारांची आतापर्यंत विधानसभेत झाली एन्ट्री

## 1995 मध्ये सर्वाधिक अपक्ष आमदार ठरले किंगमेकर

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राज्यातील विधान सभेच्या निवडणूकीत ज्या इच्छुक उमेदवारांना राजकीय पक्षांकडून उमेदवारी मिळाली नाही . अशा इच्छुक उमेदवारांनी बंडखोरी करीत अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढविली आणि त्यात ते यशस्वी झाले होते . यामुळे १९६२ पासून आतापर्यंत १३ निवडणूका झाल्या असून त्यामध्ये २४५ अपक्ष उमेदवारांनी यश संपादन करीत विधानसभेत एन्ट्री केली आहे .**

राज्यातील विधानसभेच्या निवडणुकीत सर्वच राजकीय पक्षाकडून अनेक इच्छुक उमेदवार असतात यापैकी विविध पक्षाच्या ध्येय धोरणानुसार ठराविक उमेदवारानांच पक्षाकडून उमेदवारी दिली जाते . यामुळे आधीच कंबर कसून राजकीय आखाड्याची तयारी केलेले नाराज झालेले उमेदवार बंडखोरी करीत अपक्ष उमेदवारी दाखल करून आपल्या समर्थक कार्यकर्त्यांच्या बळावर राजकीय पक्षाच्या उमेदवारांचा पराभव करीत यश संपादीत करतात . यामुळे राज्यात आतापर्यंत १९६२ पासुन १३ निवडणूका झाल्या असुन यामध्ये २४५ अपक्ष आमदारांनी विधानसभेत एन्ट्री केली आहे . तर १९९५ मध्ये सर्वाधिक



४५ अपक्ष आमदार विजयी झाले होते . त्यावेळी युतीच्या सत्ता स्थापनेत त्यांचा सिंहाचा वाटा ठरला होता . तेव्हा अपक्ष आमदारांचे नेते हर्षवर्धन पाटील होते . तर २०१९ मध्ये झालेल्या निवडणूकीत १४०० अपक्ष उमेदवार रिंगणात उतरले होते त्यापैकी केवळ १३ उमेदवारांच्या गळ्यात विजयाची माळ पडली होती . सद्यस्थितीत २०२४ च्या होत असलेल्या विधान सभा निवडणूकीतही राजकीय पक्षांनी तिकीट नाकारलेल्या इच्छुक उमेदवारांनी बंडखोरी करीत आपली उमेदवारी दाखल केली असुन काही उमेदवार सुरुवाती पासुनच अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्याच्या तयारीला लागले आहेत . तर निवडणूकीच्या या रिंगणात किती? अपक्ष उमेदवार आपली तटस्थ भूमिका घेवून राजकीय पक्षांच्या उमेदवारांना टक्कर देतात याचे खरे चित्र माघारीच्या तारखे नंतरच स्पष्ट होणार आहे राज्यातील विधानसभेच्या निवडणुकीत सर्वच राजकीय पक्षाकडून अनेक इच्छुक उमेदवार असतात यापैकी विविध पक्षाच्या ध्येय धोरणानुसार ठराविक उमेदवारानांच पक्षाकडून उमेदवारी दिली जाते .

### आमदारांची भूमिका ठरते महत्वाची

राज्यातील काही अपक्ष आमदारांची राजकीय ताकद ओळखून त्यांना आपल्या राजकीय पक्षात संधी दिली जाते . १९९५ मध्ये अपक्ष आमदारांचे नेते हर्षवर्धन पाटील कधी काळी भाजपमध्ये होते . यंदा मात्र, ते शरद पवार गटाच्या राष्ट्रवादीकडुन निवडणूकीच्या रिंगणात उतरले आहेत . १९९५ मध्ये त्यांच्या नेतृत्वाखाली सर्व अपक्ष आमदार एकत्र आले होते . राज्यातील विधान सभेच्या निवडणूकीत ज्या इच्छुक उमेदवारांना राजकीय पक्षांकडून उमेदवारी मिळाली नाही .

# पतीबरोबर व्हिडीओ काढणाऱ्यावर भडकली कतरिना कैफ

अभिनेत्री कतरिना कैफ आणि अभिनेता विकी कौशल बॉलीवूडमधलं लोकप्रिय कपल आहे. सध्या विकी आणि कतरिना गेल्या काही दिवसांपासून लंडनमध्ये सुट्ट्यांचा आनंद घेतायत. अनेकदा विकी आणि कतरिनाचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असतात. या कपलचे लाखो चाहते असल्याने अभिनय क्षेत्राव्यतिरिक्त त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातल्या गोष्टीही चाहत्यांना पाहायला आवडतात. अशातच आता या कपलचा लंडनमधला एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतोय.कतरिना आणि विकीच्या व्हायरल झालेल्या या व्हिडीओमध्ये ते लंडनच्या स्ट्रीटवर फिरताना दिसतायत. कतरिनाने काळ्या रंगाचं जॅकेट, जीन्स आणि शूज परिधान केलेले दिसतायत; तर विकीने निळ्या रंगाची जीन्स, तपकिरी रंगाचे बूट आणि त्यावर जॅकेट घातलेलं दिसतंय. यात लक्ष वेधणारी गोष्ट अशी की दोघंही झेब्रा क्रॉसिंगमधून रस्ता क्रॉस करत असताना त्यांचं शूट होतंय हे कतरिनाच्या लक्षात येताच तिने विकीला मागे खेचलं. याआधी कतरिना आणि विकीचा लंडनमधलाच एक व्हिडीओ व्हायरल झाला होता. त्या व्हिडीओवर नेटकरी संतापले होते. त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात ढवळाढवळ



तरी करू नका, त्यांना त्यांचं आयुष्य जगू द्या, अशा कमेंट्स अनेकांनी त्या व्हिडीओवर केल्या होत्या. आता या व्हिडीओवरदेखील नेटकऱ्यांच्या भरभरून कमेंट्स आल्या आहेत. एकाने कमेंट करत लिहिलं, “खरंतर कतरिना भडकली आहे, त्यांनापण त्यांची प्रायवसी हवी असते.” तर दुसऱ्याने संताप व्यक्त करत कमेंट केली आणि लिहिलं, “प्रत्येक जागी त्यांना त्रास देणं बंद करा, त्यांना प्रायवसी द्या. तुमच्या कॅमेरासाठी त्यांनी जन्म घेतलेला नाही.”अनेकांनी असंही म्हटलंय की, कतरिनाने व्हिडीओ शूट करताना पाहिला आणि विकीला मागे खेचलं. कतरिना आणि विकीचा हा व्हिडीओ पहिल्यांदा रेडिटवरून व्हायरल झाला. दरम्यान, कतरिना आणि विकीच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर छत्रपती संभाजी महाराजांवर आधारित ‘छावा’ चित्रपटात विकी कौशल रश्मिका मंदानाबरोबर दिसणार आहे.

## रणबीर-आलियाच्या लेकीचा गोड अंदाज

बॉलीवूड कलाकारांपेक्षा सध्या सोशल मीडियावर स्टारकिड्सची मोठ्या प्रमाणात चर्चा असते. आलिया भट्ट आणि रणबीर कपूर या दोघांची जोडी कलाविश्वात प्रचंड लोकप्रिय आहे. परंतु, या दोघांपेक्षा जास्त आता त्यांची लेक राहा कपूर चर्चेत असते. तिचा गोड अंदाज, थक्क करणारे हावभाव या गोष्टींची सध्या नेटकऱ्यांना चांगलीच भुरळ पडली आहे. आलिया भट्ट आणि रणबीर कपूर यांनी एकमेकांना अनेक वर्षे डेट केल्यावर एप्रिल २०२२ मध्ये लग्नगाठ बांधली. अभिनेत्रीने ६ नोव्हेंबर २०२२ रोजी सोशल मीडियावर आनंदाची बातमी शेअर करत चाहत्यांना राहा कपूरचा जन्म झाल्याचं सांगितलं. यानंतर जवळपास वर्षभराने आलिया-रणबीरने त्यांच्या लेकीचा चेहरा सोशल मीडियावर रिव्हिल केला.२०२३ मध्ये ख्रिसमसच्या दिवशी आलिया-रणबीरने सर्वांना राहाची पहिली.

## मिनिटासाठी 1 कोटी मानधन


बॉलीवूड सिनेसृष्टीत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणाऱ्या अनेक अभिनेत्री आहेत. आलिया भट्ट, दीपिका पदुकोण, प्रियांका चोप्रा अशा आघाडीच्या अभिनेत्रींना मागे टाकत एक अभिनेत्री अशी आहे; जी त्यांच्यापेक्षा जास्त मानधन घेते. मॉडेल व अभिनेत्री उर्वशी रौतेला एका मिनिटासाठी चक्क एक कोटी रुपये मानधन आकारते. ‘डीएनए इंडिया’ने दिलेल्या माहितीनुसार, उर्वशी रौतेलाने तीन मिनिटांच्या गाण्यासाठी चक्क एक कोटी रुपयांचं मानधन स्वीकारलं होतं. या अभिनेत्रीनं ‘स्कंद’ चित्रपटात ‘कल्ट मामा’ गाण्यावर डान्स केला. या तीन मिनिटांच्या गाण्यासाठी उर्वशीनं चक्क तीन कोटींचं मानधन घेतलं होतं. म्हणजेच एका मिनिटासाठी उर्वशीनं एक कोटी रुपये मानधन घेतलं. त्यामुळे एका मिनिटासाठी एक कोटी मानधन घेणारी ती भारतातली पहिलीच अभिनेत्री ठरली.याआधी उर्वशी रौतेलानं चिरंजीवी अभिनीत ‘वॉल्टेअर वीरैया’मधील गाण्यासाठी दोन कोटी रुपये मानधन घेतलं होतं. उर्वशी रौतेलाचे इन्स्टाग्रामवर ७१ दशलक्षांहून अधिक फॉलोअर्स आहेत आणि तिची एकूण संपत्ती ५५० कोटींहून अधिक असल्याचा अंदाज आहे. उर्वशी रौतेला ‘फोर्ब्स’च्या टॉप १० मध्ये समाविष्ट होणारी सर्वांत तरुण भारतीयदेखील आहे.आता ही अभिनेत्री एका ६३ वर्षीय साऊथ सुपरस्टारबरोबर काम करण्यासाठी सज्ज झाली आहे. उर्वशी सध्या नंदामुरी बालकृष्णा यांच्यासह तिच्या ‘एन बी के-१०९’ या आगामी चित्रपटाची तयारी करीत आहे. चित्रपटातील ॲक्शन सीक्वेन्ससाठी तिला एम एम के



## आदित्य रॉय कपूर आणि अनन्या पांडेचं ब्रेकअप

गेली दोन वर्षे आदित्य रॉय कपूर आणि अनन्या पांडे एकमेकांना डेट करत असल्याचं बॉलीवूडमध्ये बोललं जात होतं. अभिनेत्रीने तिच्या रिलेशनशिपवर ‘कॉफी विथ करण’ या शोमध्ये देखील भाष्य केलं होतं. तसेच या दोघांचे एकत्र फिरायला गेल्याचे फोटो सुद्धा अनेक ठिकाणी व्हायरल झाले होते. सगळं उत्तम सुरू असतानाच गेल्या महिन्याभरापासून आदित्य आणि अनन्याचं ब्रेकअप झाल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. अशातच त्यांच्या जवळच्या मित्राने दोघांच्या नात्याबाबत मोठा खुलासा केला आहे.आदित्य आणि अनन्याच्या जवळच्या मित्राने अलीकडेच ‘टाइम्स ऑफ इंडिया’शी संवाद साधताना या दोघांच्या नात्याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. अनन्या पांडे आणि आदित्य रॉय कपूर यांचं ब्रेकअप झाल्याच्या वृत्ताला या जवळच्या मित्राने दुजोरा दिला आहे. “दोघेही साधरण महिन्याभरापूर्वी एकमेकांपासून वेगळे झाले आहेत. दोघांचं बॉण्डिंग खूपच स्ट्रॉंग होतं. परंतु, ते दोघेही वेगळं होणं हे आमच्यासाठी खूपच धक्कादायक आहे. सध्या अनन्या या ब्रेकअपच्या मानसिकतेतून सावरण्याचा प्रयत्न करत आहे. कोणासाठीही ब्रेकअप होणं हे दु:खदायकच असतं.” असा खुलासा दोघांच्या जवळच्या मित्राने केला आहे.आदित्य गेल्या महिन्यात अनन्या पांडेची चुलत बहीण अलाना पांडेच्या डोहाळे जेवणाला उपस्थित राहिल्याचं पाहायला मिळालं. मात्र, त्यानंतर लगेचच आदित्य-अनन्यामध्ये काहीतरी बिनसलं असल्याच्या चर्चांनी जोर धरला होता.

## राजकुमार रावने प्लास्टिक सर्जरी केलीये?



आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारा बॉलीवूड अभिनेता राजकुमार राव दिलजीत दोसांझच्या कॉन्सर्टमध्ये दिसल्यापासून चर्चेत आहे. या कॉन्सर्टमध्ये अभिनेता नेहमीपेक्षा थोडा वेगळा दिसत होता. दरम्यान, या कॉन्सर्टमधील राजकुमारचे पापाराझींनी काढलेले फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आणि राजकुमारने प्लास्टिक सर्जरी केल्याच्या चर्चांना उधाण आलं. त्यावर आता राजकुमारनं मौन सोडलं आहे. नुकत्याच ‘बॉलीवूड हंगामा’ला दिलेल्या मुलाखतीत राजकुमार राव म्हणाला, “मी कोणतीही प्लास्टिक सर्जरी केली नाही आहे. व्हायरल झालेला फोटो फक्त एक वाईट फोटो होता,असं आपण म्हणू शकतो. त्या फोटोला टच-अप्स केले आहेत. मला खूपदा वाटतं की, माझी त्वचा अशी नितळ आणि चमकदार असती, तर किती चांगलं झालं असतं. कारण- त्या फोटोत मी तसाच दिसत होतो. मी तेव्हा कोणताच मेकअप केला नव्हता; पण मलाही वाटलं की, तो फोटो खूप विचित्र दिसत होता. कॅमेऱ्यात कैद झालेला तो एक वाईट क्षण होता. मी कोणतीही प्लास्टिक सर्जरी केलेली नाही.”आठ वर्षांअगोदर मी हनुवटीसाठी काही फिलर वर्क केलेलं. कारण- मला आत्मविश्वास असल्यासारख दिसायचं होतं. तेव्हा माझ्या त्वचाशास्त्रज्ञानं मला सल्ला दिला होता आणि मी त्याप्रमाणे केलं. त्यानंतर माझा आत्मविश्वास वाढला का? तर हो. त्यानंतर मी आणखी चांगले चित्रपट केले आहेत आणि त्यामुळे माझा दृष्टिकोन बदलला आहे. अभिनय हे दृश्य माध्यम आहे. माझा याला विरोध नाही. जर एखाद्याला त्याचा आत्मविश्वास वाढवायचा असेल आणि विज्ञान उपलब्ध

# युवा टीम इंडियाचा 107 धावांत खुर्दा

## कर्णधार ऋतुराज गायकवाड भोपळाही फोडू शकला नाही

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**बॉर्डर गावस्कर ट्रॉफीच्या तयारीचा भाग म्हणून भारतीय अं संघाचा ऑस्ट्रेलिया दौरा सुरू झाला आहे. मात्र या दौऱ्याची सुरुवात फारशी आशादायक झालेली नाही. मॅकके इथे सुरू झालेल्या पहिल्या अनऑफिशियल टेस्टमध्ये भारतीय संघाचा डाव १०७ धावांतच आटोपला आहे. भारताच्या कसोटी संघात स्थान मिळवण्यासाठी प्रयत्नशील खेळाडू अ संघाचा भाग आहेत. कर्णधार ऋतुराज गायकवाडला भोपळाही फोडता आला नाही.**



ऑस्ट्रेलिया अ संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. त्यांच्या गोलंदाजांनी हा निर्णय अचूक असल्याचं सिद्ध केलं. पहिल्याच चेंडूवर बकिंगहमने ऋतुराजला माघारी धाडलं. भारतीय संघात स्थान पटकावलेल्या अभिमन्यू इश्वरनने काही काळ प्रतिकार केला मात्र आठव्या षटकात बकिंगहमनेच त्याचा प्रतिकार संपुष्टात आणला. त्याने ७ धावा केल्या. काऊंटी क्रिकेटमध्ये तसंच रणजी क्रिकेटमध्ये दमदार प्रदर्शन करणाऱ्या साई सुदर्शनने २१ धावांची खेळी केली. डोगेटने त्याला बाद केलं. देवदत्त पड्डिकलने ३६ धावांची संयमी खेळी करत भारताचा डाव सावरला. डोगेटने त्याला फिलीप्सच्या हाती झेल देण्यास भाग पाडलं.गेली अनेक वर्ष डोमेस्टिक क्रिकेटमध्ये खोऱ्याने धावा करणाऱ्या बाबा इंद्रजीतला मोठी खेळी करण्यात अपयश आलं. त्याने ९ धावा केल्या. राष्ट्रीय संघातून बाहेर फेकला गेलेला आणि करारसूचीतून बाहेर झालेला इशान किशन सध्या पुनरागमनच्या प्रतीक्षेत आहे. त्याच्यासाठी हा दौरा अतिशय महत्त्वाचा मानला जात आहे. त्याला केवळ ४ धावा करता आल्या. अष्टपैलू म्हणून भारतीय संघात स्थान पटकावलेल्या नितीश कुमार रेड्डीला डोगेटने भोपळाही फोडू दिला नाही. तळाच्या फलंदाजांपैकी नवदीप सैनीने २३ धावा करत संघर्ष केला. ऑस्ट्रेलिया अ संघातर्फे ब्रेंडन डोगेटने ११ षटकात अवघ्या १५ धावांच्या मोबदल्यात ६ विकेट्स पटकावल्या. डोगेटने ६ निर्धाव षटकं टाकत भारतीय फलंदाजांवर वचक ठेवला. फर्ग्युस ओनील आणि जॉर्डन बकिंगहम यांनी डोगेटला चांगली साथ दिली. प्रत्युत्तरादाखल खेळताना ऑस्ट्रेलिया अ संघाचीही डळमळीत सुरुवात झाली. सॅम कोन्टासला मुकेश कुमारने तंबूत धाडलं. त्याला भोपळाही फोडता आला नाही. कॅमेरुन बॅनक्रॉफ्टला प्रसिध कृष्णाने माघारी धाडलं. त्यालाही खातं उघडता आलं नाही. ऑस्ट्रेलियासाठी खेळलेला मार्कस हॅरिस १७ धावा करुन बाद झाला. डोगेटने त्याला फिलीप्सच्या हाती झेल देण्यास भाग पाडलं.गेली अनेक वर्ष डोमेस्टिक क्रिकेटमध्ये खोऱ्याने धावा करणाऱ्या बाबा इंद्रजीतला मोठी खेळी करण्यात अपयश आलं. त्याने ९ धावा केल्या. राष्ट्रीय संघातून बाहेर फेकला गेलेला आणि करारसूचीतून बाहेर झालेला इशान किशन सध्या पुनरागमनच्या प्रतीक्षेत आहे. त्याच्यासाठी हा दौरा अतिशय महत्त्वाचा मानला जात आहे. त्याला केवळ ४ धावा करता आल्या. अष्टपैलू म्हणून भारतीय संघात स्थान पटकावलेल्या नितीश कुमार रेड्डीला डोगेटने भोपळाही फोडू दिला नाही. तळाच्या फलंदाजांपैकी नवदीप सैनीने २३ धावा करत संघर्ष केला. ऑस्ट्रेलिया अ संघातर्फे ब्रेंडन डोगेटने ११ षटकात अवघ्या १५ धावांच्या मोबदल्यात ६ विकेट्स पटकावल्या. डोगेटने ६ निर्धाव षटकं टाकत भारतीय फलंदाजांवर वचक ठेवला. फर्ग्युस ओनील आणि जॉर्डन बकिंगहम यांनी डोगेटला चांगली साथ दिली. बॉर्डर गावस्कर ट्रॉफीच्या तयारीचा भाग म्हणून भारतीय अं संघाचा ऑस्ट्रेलिया दौरा सुरू झाला आहे. मात्र या दौऱ्याची सुरुवात फारशी आशादायक झालेली नाही. मॅकके इथे सुरू झालेल्या पहिल्या अनऑफिशियल टेस्टमध्ये भारतीय संघाचा डाव १०७ धावांतच आटोपला आहे. भारताच्या कसोटी संघात स्थान मिळवण्यासाठी प्रयत्नशील खेळाडू अ संघाचा भाग आहेत. कर्णधार ऋतुराज गायकवाडला भोपळाही फोडता आला नाही. ऑस्ट्रेलिया अ संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. त्यांच्या गोलंदाजांनी हा निर्णय अचूक असल्याचं सिद्ध केलं. पहिल्याच चेंडूवर बकिंगहमने ऋतुराजला माघारी धाडलं. भारतीय संघात स्थान पटकावलेल्या इश्वरनने काही काळ प्रतिकार केला.

### डोगेटने6 विकेट्स पटकावल्या

तळाच्या फलंदाजांपैकी नवदीप सैनीने २३ धावा करत संघर्ष केला. ऑस्ट्रेलिया अ संघातर्फे ब्रेंडन डोगेटने ११ षटकात अवघ्या १५ धावांच्या मोबदल्यात ६ विकेट्स पटकावल्या. डोगेटने ६ निर्धाव षटकं टाकत भारतीय फलंदाजांवर वचक ठेवला. फर्ग्युस ओनील आणि जॉर्डन बकिंगहम यांनी डोगेटला चांगली साथ दिली. प्रत्युत्तरादाखल खेळताना ऑस्ट्रेलिया अ संघाचीही डळमळीत सुरुवात झाली. सॅम कोन्टासला मुकेश कुमारने तंबूत धाडलं. त्याला भोपळाही फोडता आला नाही. कॅमेरुन बॅनक्रॉफ्टला प्रसिध कृष्णाने माघारी धाडलं. त्यालाही खातं उघडता आलं नाही.

# रोहित-सूर्या-हार्दिक-बुमराह रिटेन

## सूर्याला 16.35 कोटींना रिटेन केलं आहे. तिलकला 8 कोटींना रिटेन

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**स्पर्धेतला बहुचर्चित असा हा संघ. मुंबई इंडियन्स संघाने गेल्या वर्षीच्या हंगामापूर्वी एका धक्कादायक निर्णय घेतला. पाच जेतेपदं मिळवून देणाऱ्या रोहित शर्माऐवजी मुंबईने हार्दिक पंड्याची कर्णधार म्हणून नियुक्ती केली. हार्दिकने मुंबई इंडियन्समधूनच आयपीएल कारकीर्दीला सुरुवात केली.**



अष्टपैलू हार्दिक पंड्याने मुंबईच्या जेतेपदांमध्ये मोलाची भूमिका बजावली आहे. मात्र गुजरात टायटन्स संघाने हार्दिकला ताफ्यात समाविष्ट केलं आणि समीकरणं बदलली.हार्दिकने स्वत:मधल्या नेतृत्वगुणांचा प्रत्यय घडवत पदार्पणाच्या हंगामातच गुजराताला जेतेपद मिळवून दिलं. सलग दुसऱ्या वर्षीही हार्दिकच्या नेतृत्वातील गुजरातने अंतिम फेरी गाठली पण जेतेपद त्यांना मिळू शकलं नाही. यानंतर ट्रेडऑफमध्ये मुंबई इंडियन्स संघाने हार्दिकला आपल्या ताफ्यात घेतलं. हार्दिकच्या समावेशाने संघाला संतुलन आणि बळकटी मिळेल असा विश्वास मुंबई संघव्यवस्थापनाला होता. हा विश्वास हार्दिकने सार्थ ठरवला. मुंबईने कर्णधार म्हणून रोहितच्या जागी हार्दिकची नियुक्ती केल्याने वादाला तोंड फुटलं. हार्दिकला सोशल मीडियावर आणि प्रत्यक्ष मैदानावरही प्रचंड ट्रोलिंगला सामोरं जावं लागलं. मुंबई इंडियन्सची कामगिरीही लौकिकाला साजेशी झाली नाही आणि त्यांना प्राथमिक फेरीतच गाशा गुंडाळावा लागला. यामुळे हार्दिकवरच्या टीकेचा जोर वाढला.हार्दिककडेच मुंबई संघाची सूत्रं आहेत असल्याने रिटेन्शन यादीत तो आहे. चाळिशीकडे झुकलेला आणि आंतरराष्ट्रीय टी२० प्रकारातून निवृत्ती घेतलेला रोहित शर्मा आणखी किती वर्ष खेळणार याबाबत स्पष्टता नाही.

### सूर्यकुमार भारताचा कर्णधार

पण आणखी काही वर्ष रोहितने आपल्यासाठीच खेळावं असा मुंबईचा आग्रह असेल आणि त्याप्रमाणेच मुंबईने त्याला रिटेन केलं आहे. रोहितला पाच रिटेन केलेल्या खेळाडूच्या तुलनेत रोहितला कमी म्हणजेच १६ कोटी रक्कम आहे. मुंबई इंडियन्सकडून खेळतानाच सूर्यकुमार यादवने स्वत:च्या गुणवत्तेला न्याय देत दमदार भरारी घेतली. आंतरराष्ट्रीय टी२० प्रकारात सूर्यकुमारने अव्वल स्थानी झेप घेतली. या प्रकारात सूर्यकुमार भारताचा कर्णधारही झाला.